# - खरा भक्त -

शिवापूर नावाचं एक गाव होतं गावाजवळून शिवगंगा नावाची नदी वाहत होती. त्या नदीचे काठी शिवशंकराचे सुंदर मंदिर होतं. सारे गावकरी नित्य नेमाने शिवदर्शनासाठी मंदिरात येत असत.

त्या गावात सोमा धनगर नावाचा धनगर राहत असे तो मोठा शिवभक्त होता. त्याचा एक नेम असे. तो मेंढर घेऊन रानात जाई. सूर्य डोक्यावर आला की मेंढर झाडाखाली बसवी. लंगोटी लावी नदीवर जाई. आंघोळ करी. तोंडात पाण्याची चूळ घेई. रानातच बेलाचे झाड होतं. एक बिल्व पान घेई. ओलेत्यानेच मंदिरात येई. शिवपिंडीवर केलेली पूजा बाजूला सारी आपल्या तोंडातील चूळ पिंडीवर टाकी. बेलाचे पान वाही शंभो हर हर म्हणे. असे बरेच दिवस चालले होते

एकदा शिवपार्वती आकाशमार्गाने जात असता पार्वतीने शंकराला विचारले, "देवा तुमचा आवडता भक्त कोण?" तेव्हा शंकर म्हणाले, "शिवापूर गावातील सोमा धनगर" पार्वती म्हणाली काय, देवा, काय सांगता हे! तो धनगर तुमच्या अंगावर चूळ टाकतो, तो तुमचा आवडता भक्त कसा?" शंकर म्हणाले, "ततकरच केलं,"

शिवपिंडीवरील पूजा रोज कुणी तरी विस्कटून टाकतो, हे गावच्या मुखियाला समजले. त्याने गुपचूप आपले सेवक मंदिरात ठेवले. कोण पूजा विस्कटतो ते पहाण्यासाठी. सेवकांनी येऊन मुखियास सांगितले की आपल्या गावातील सोमा धनगर आपली पूजा बाजूला सारतो. तोंडातील चूळ पिंडीवर टाकतो. बेलाचे एक पान वाहतो. शंभो हर हर म्हणून जातो. हे ऐकून मुखियास राग आला. त्याने सोमाला अद्दल घडविण्याचे ठरविले.


FOR EDUCATIONAL USE

श्रावणी सोमवार आला. सुखिया स्वतः पूजेला बसला. चांदीच्या अभिषेक पात्रातून पिंडीवर पाण्याची संतत धार पडत होती. पंच उपचारांनी शिवपूजन चालू होते. नित्य नियमाने सोमा धनगर तोंडात चूळ घेऊन आला. तो मंदिराच्या दारात पोहचतो न पोहचतो तोच धरणीकंप झाला. सारं मंदीर हलू लागलं. ते पाहून सुखिया बाहेर पळाला. सोमा मात्र आत धावला. पिंडीवर पालथा पडला. काय पडायचं ते माझ्या अंगावर पडो पण माझ्या देवाला काही लागता कामा नये.

भगवान शंकर म्हणाले, "देवी पाहिलत कां? जीवाच्या भीतीने सुखिया बाहेर पळाला. पण जीवावर उदार होऊन सोमा माझ्या पिंडीवर पालथा पडला. आता सांगा खरा भक्त कोण! मधाळपणे पार्वती माता म्हणाल्या 'सोमा धनगर'!

XOX

कमलाकर कुलकर्णी - पुणे



BARFI
लिखो प्रेम से!

FOR EDUCATIONAL USE